


# निद्रानाश, जग आणि चेटूक

▶ चन्द्रशेखर पुरन्दरे

'झोपू कशी, डाव्या कुशी' या सांगण्यानुसार त्याला आयुष्यभर डाव्या कुशीवर झोपण्याची सवय होती. अलीकडे काही वर्षे निद्रानाश सुरु झाला. झोप ही जणू एक हवीहवीशी वाटणारी अप्राप्य परी झाली. 'देरसे कितनी दूर खडी हो, और करीब आ जाओ' अशी प्रार्थना तो रोज करत असे! तिचे जवळ येणे कोणता खलनायक अशक्य करत आहे? या किंवा पूर्वजन्मीचे पाप? सैतान? देव? दैव?

आधुनिक वैद्यकशास्त्रावर त्याचा विश्वास नव्हता. उपाय झाला तर तुमचे सुदैव, शाश्वती नाही. पण जीवघेणे साईड-इफेक्ट्स होणार हे नक्की. त्यामुळे तो झोपेच्या गोळ्यांच्या नादी लागला नाही. होमिओपॅथी आणि आयुर्वेदाचे अयशस्वी प्रयोग केले. मग योगाचा प्रयत्न केला पण चिकाटी नव्हती, आता त्याने निद्रा प्राक्तनावर सोडली आहे.

सवयीप्रमाणे दिवा अकराच्या सुमाराला बंद केल्यावर दहा-पंधरा मिनिटे गुंगी आल्यासारखे वाटे. पण झोप येत नसे. तीनपर्यंत तो जागाच असे. वाचन, दिवा बंद करा, तासाभरानंतर परत लावा हा कार्यक्रम. या रुटीनमुळे 'आज' आणि 'उद्या' यातला फरक नाहीसा होतो. उद्या असे करु म्हणेपर्यंत उद्या चालू झालेला असतो!

मग झोप येण्यासाठी या कुशीवरुन त्या कुशीवर वळणे सुरु झाले. त्या अलटापलटीत त्याला डाव्या आणि उजव्या कुशीवर

झोपण्याचा प्रयत्न करण्यातील फरक लक्षात येऊ लागला. मेंदूचे निम्मे भाग निराळे वागतात हे खरे असावे!

डाव्या कुशीवर झोपल्यास झोप लागता लागता बऱ्याचदा शास्त्रोक्त भारतीय गायन ऐकू येई. संगीत मंद असे. सुरावट स्पष्ट ऐकू येई. झोप लागेपर्यंत ते चालू राही. जेव्हा केव्हा ऐकू येई तेव्हा जागरणातील ती एकच सुखद गोष्ट असे. नंतर गायन मागे चालू राहून अप्रिय भेटी मिळत.

एखादा विचित्र मोठा आवाज ऐकू येई. तरी चिकाटीने कूस न बदलता पडून राहिले तर जरा वेळाने परत निराळा आवाज येई. आजवर त्याने सोशीकपणे त्याच कुशीवर असे सहा-सात आवाज अनेकदा ऐकले, मग कूस बदलली. प्रत्येक आवाज निराळा असे, निराळ्या तीव्रतेचा असे. कधी कानातून आवाज येतो असे वाटे, कधी घशातून तर कधी छातीतून घशापर्यंत. कधी बाहेरुनही आवाज आल्याचा भास होई. खूप उंचावरुन एखादा जड खांब लाकडी जमिनीवर पडल्याचा आवाज, लोखंडी पाईप जमिनीवरुन घासत नेल्याचा आवाज, एखादा पशू ओरडल्याचा आवाज, वगैरे. अर्थात ते आवाज माहीत असलेल्या अनुभवांच्या चौकटीत बसवण्याचा हा प्रयत्न असे. आवाज लोखंडी पाइपाचा नसे ना कुत्रे भुंकण्याचा... आवाजाच्या जवळात जवळचा अनुभव कोणता होता ते तो आठवे आणि आवाज तसा होता असे स्वतःला सांगे. म्हणजे हा प्रयत्न व्याख्येनेच तोकडा आणि असमाधानकारक असे. कारण मुळात आवाज वास्तवात नसेच. खुलासा हे अवास्तवावर आवरण असे. ती सवयीची गुलामगिरी. त्या खुलाशांनी आवाज कधीच थांबणे शक्य नसे व ते थांबलेही नाहीत. तोच आवाज त्या रात्री किंवा परत कधीही ऐकू येत नसे. तसेच दोन आवाजातील अंतर अनियमित असे. त्यामुळे पुढचा आवाज केव्हा येईल याचा अंदाज करता येत नसे. तुरुंगातील कैद्यांचे मानसिक संतुलन बिघडावे म्हणून एक चिनी पद्धत असते. कैद्याला स्टूलावर बांधून बसवत. छताला एक भांडे टांगलेले असे. त्यात पाणी असे. भांड्याच्या तळाला एक भोक असे. अनियमित मध्यंतराने त्या भोकातून एकेक थेंब कैद्याच्या डोक्यावर पडत असे. या छळाने काही काळाने कैद्याला वेड लागे.

आवाजाखेरीज आणखी काही त्रास डाव्या कुशीवर असत. पायांची आग होते आहे असे वाटे. मग तो उठून कैलाश जीवन लावत असे. मध्येच तळपायाला टाचणी टोचल्यासारखे वाटे, मग हाताला तसेच, इत्यादी. त्यात कधीकधी उचक्या, शिंका, खोकला.

झोपेचा प्रयत्न करुन साधारण दोन तास झाले की उजवा पाय गुडघ्याखाली उडू लागे. झोप लागलीच तर पाय शांत तरी होई किंवा त्याचे उडणे जाणवत नसे. एक पाय उडत असताना झोपणे अशक्य होई. दरम्यान एक नाकपुडी बंद होऊन श्वास घेणे कठीण होई. कधी कधी श्वासाचा घर्र घर्र असा आवाजही होत असे.

असे शारीरिक लहान मोठे क्लेश असतच, बरोबर मानसिक जगही काही आकर्षक नसे. आठवत ती सगळी ओळखीची, भूतकालीन माणसे व प्रसंग. त्यातही अपमान, मानहानी, अवहेलना, दुर्लक्ष, अनुल्लेख, फसवणूक, तुच्छता, उपेक्षा, शरम आलेले प्रसंग असत. ते कित्येक वर्षांपूर्वीचे असले तरी त्यांची झणझण ताजी असे.

अपमानात अग्रेसर एक प्रसंग म्हणजे त्याला एका जर्मन विद्यापीठाने पदव्युत्तर उच्च शिक्षणासाठी तेथे येण्याची संधी दिली. अट अशी की त्याने जर्मन भाषा उच्च दर्जापर्यंत शिकावी कारण शेवटचा प्रबंध जर्मन भाषेत असेल. त्याने स्वखर्चाने एक वर्ष घालवून एका महागड्या संस्थेत जर्मन भाषेचे शिक्षण घेतले. वर्षभर हे शिक्षण झाल्यावर जर्मन विद्यापीठाने दोन ओळींच्या पत्राने त्याची निवड रद्द झाल्याचे कळवले! ना दाद ना फिर्याद. बरोबरच्या दोन मुलींची निवड झाली. स्त्रीवाद!

अवहेलनांच्या आठवणी तर अनेक होत्या. ती प्रत्येक वेळी स्वतःची वैयक्तिकच नव्हे तर नातलगांचीही. एका अगदी जवळच्या श्रीमंत मित्राचे लग्न होते. तो परगावी असल्याने जाऊ शकत नव्हता. आमंत्रण सगळ्यांना होते म्हणून त्याने आई-वडिलांना लग्नाला जायला भाग पाडले. ते गेले. त्यांना तेथे तुच्छतेने वागवण्यात आले, त्यांच्याकडे दुर्लक्षच करण्यात आले. ही घटना त्याला जिव्हारी लागली.

शिवाय काही हजारांपासून अनेक लाखांपर्यंत 'उसने' घेतलेले पैसे अदृश्य करणारे लोक सतत भेटत गेले.

एकदा घरातले एक छोटे सुतारकाम ओळखीच्या एकाला दिले. तो माणूस घरच्या स्वयंपाकीण बाईचा नवरा. पहिल्या दिवशी त्याने काम केले आणि दुसऱ्या दिवशी काही माल आणण्यासाठी पैशाची मागणी केली. सुटे नव्हते म्हणून त्याने दोन हजाराची नोट दिली. माणूस गायब! दुसरा दिवस झाला, तिसरा झाला, याचा पत्ता नाही. तो अट्टल दारुड्या होता हे नंतर कळले! त्याची बायको कामाला रोज येत होती पण तिला हे विचारणे त्याला प्रशस्त वाटेना, मग ते पैसे अक्कलखाती जमा झाले.

एका हस्तलिखिताचे टायपिंग करायला एकाला अडीच हजार आगाऊ दिले, तोही गायब!

इथपासून सुरुवात होऊन चढत्या भाजणीने अक्कलखाते अधिकाधिक संपन्न होत गेले.

एका web-designer ने अठरा हजार रुपये घेतले आणि काहीही काम केले नाही. मग दुसरा शोधला. त्याने search engine चे काम करतो असे आश्वासन देऊन पंचवीस हजार घेतले. या इसमाला search engine ची माहितीच नव्हती! पैसे गेले!

थोडे पैसे आल्यावर सुरक्षित गुंतवणूक म्हणून त्याने LIC त



जंगलात शिरताना

गुंतवले. पहिली काही वर्षे काम व्यवस्थित झाले. दहा वर्षांनंतर मोठी रक्कम अपेक्षित होती. तो परतावा अगदीच कमी आला. मग त्या माणसाला वारंवार आठवण करुन देणे. पैसे देण्यापेक्षा हा follow up त्याला अतिशय त्रासदायक असे. शेवटी कुत्र्याला तुकडा द्यावा असे एजंटाने काही लाखांच्या ऐवजी चार-पाच हजार तोंडावर टाकले! हा अक्कलखात्याला मोठाच लाभ झाला!

सध्या एका नातेवाईकाकडून असाच काही लाखांचा खड्डा अपेक्षित आहे. गेली तेरा वर्षे तो फक्त पैसे घेत आहे! तो या इसमाला फोन करतो, उत्तर नसते. मग whatsapp वर निरोप पाठवतो. हा गृहस्थ ते निरोप बघतही नाही!

सामान्यतः असे ७३% लोक पैसे कधीच परत करत नाहीत असे त्याने वाचले होते.

अशा बऱ्याच वेळानंतर तो उजव्या कुशीवर वळे. सुरुवातीपासून उजव्या कुशीवर निजण्याचा प्रॉब्लेम म्हणजे त्याचा उजवा खांदा जायबंदी झालेला होता. त्यावर झोपल्यास तो दुखत असे.

झोपायची खोली पहिल्या मजल्यावर होती. बाजूला खिडकी होती. तिला काच लावून ती बंद केलेली असे. कुशीवर वळल्यावर तो खिडकीचा पडदा बाजूला सरकवत असे. मग बाहेरचे दाट झाड दिसे. दिवसा ते हिरवे, पोपटी असे पण रात्री गडद हिरवे, अगदी काळसर दिसे. त्यातून मागच्या आकाशाचे विखुरलेले पुंजके दिसत. हंगाम, हवामान, चांदणे आणि तिथीनुसार आकाशाचा रंग बदलता असे. कधी लख्ख निळे - त्यातही वेगळ्या छटा, कधी पांढरे ढग, कधी दाट काळे. वारे नसले ते हे दृश्य स्थिर असे. त्यात स्तब्धता आणि शांतपणा असे. ते जाणवण्यासाठी गृहीत प्रतिमा, प्रतिमाने विसरायला लागत. म्हणजे फांद्यांमधून एखादा माहितीचा आकार दिसतो का, ते हरिणाचे डोके आहे का, दोन प्राण्यांची झुंज चालू आहे का वगैरे गोष्टी बाजूला ठेवायला लागत. वारे असले तर पानांची, फांद्यांची फक्त निःशब्द हालचाल न्याहाळावी लागे. त्यात लय शोधण्याचा प्रयत्न नको. थोडक्यात विचारहीन होऊन हे दृश्य पहावे लागे.

कधी असेही वाटे की बाहेरचे सगळे दृश्य एखाद्या तळ्यात आहे. तो तळ्यातल्या एक काचेच्या खोक्यात आहे आणि ते पहातो आहे.

पण प्रत्येक वेळी दीर्घकाळपर्यंत हे जमत नसे मग काय होणार हे माहिती असूनही परत डाव्या कुशीवर.

उजव्या कुशीवर येणारे विचार बृहद् जगाचे असत.

वास्तव आणि गूढ यांच्या सीमेवरचे बाहेरचे झाड विलोभनीय असे पण जरा वेळात इतर वास्तवाचे विचार आक्रमण करत.

पहिला त्रास होत असे तो म्हणजे समाजजीवनावर २४/७ होणाऱ्या डिजिटल आणि सोशल मीडियाच्या माऱ्याचा.

लोकांचा ज्ञान मिळवण्याच्या पारंपारिक मार्गांवर आता विश्वास राहिलेला नाही. ज्ञान दूरच, मनोरंजनासाठीही लोक पुस्तके वाचत नाहीत. एक-दोन मिनिटांची चमकदार प्रक्षेपणे अव्याहत यूट्यूब, इन्स्टाग्राम, टिकटॉक वगैरेंवर चालू असतात. लहान वयापासून त्याची चटक लागते. पहिल्या प्रक्षेपणात एखादा तथाकथित विनोदी प्रसंग असतो, तो मिनिटभर दिसतो. दुसऱ्यात कोठेतरी अपघात झाल्याचे चित्रण असते. एका मिनिटात तिसऱ्यात सध्याची आघाडीची नटी महागड्या गाडीतून रस्त्यावर उतरत असते, अशा घटनांची संगती लावता येत नाही कारण त्या हेतुपुरस्सर विस्कळीतच असतात. असा मारा हा ज्ञानाचा एकमेव स्रोत झालेला आहे.

याचा परिणाम म्हणजे समाजाची बुद्धी खुंटत जाते. पाश्चात्य देशातील सर्वेक्षणावरुन हे आढळलेले आहे. लोक आता छोटे विडिओ आणि प्रतिमा बघायला प्राधान्य देतात. दीर्घ लेख वाचणे नको, गुंतागुंतीचे युक्तिवाद तर नकोच नको. 'थोडक्यात काय ते सांगा' हा उघड किंवा सुप्त आग्रह असतो. त्यामुळे बौद्धिक, विशेषतः तार्किक क्षमता वाढत नाही. माहिती कोणती आणि ज्ञान कोणते याचा विवेक रहात नाही आणि माहितीचे 'जड झाले ओझे' अशी सबब न शिकण्यासाठी दिली जाते.

लोकांना अक्षरओळख असते, तेवढीच 'साक्षरता'. २०२३ साली जवळ जवळ निम्म्या अमेरिकनांनी वर्षभरात एकही पुस्तक वाचले नव्हते. 'फक्त डिजिटल' व्यक्तीची एकाग्रता कमी होते, दीर्घ कालपर्यंत, अगदी काही मिनिटेही मन एखाद्या विषयावर स्थिर राखणे जमत नाही. ही परिस्थिती तर 'विकसित' देशातील. त्यातही तेथे वर्गभेद प्रकर्षाने दिसतो. बुद्ध्यांक कमी कमी होणे ही प्रक्रिया श्रीमंतांपेक्षा गरीबांच्यात अधिक वेगाने होत आहे. तेथे अनेक शाळा आजकाल मुलांना दीर्घ वाचनाचे गृहपाठ देत

नाहीत कारण मुले तो अभ्यास करतच नाहीत.

आपल्याकडेही वाचन होते त्याहून कमी झालेले दिसते अगदी उच्चशिक्षितांनीही अभिजात वाङ्मय ऐकलेलेही नसते, एखादे तसे पुस्तक वाचणे दूरच. तुम्ही कोणत्याही क्षेत्रातील तज्ज्ञ असा - डॉक्टर, इंजिनीयर, चार्टर्ड अकाउंटंट... काही मूलभूत वाङ्मयाची, आदर्शवादांची ओळख असणे आवश्यक असते ही जाणीवच समाजात राहिलेली नाही. ही परिस्थिती आहे-रे गटाची. आपल्याकडे नाही-रे बहुसंख्य आहेत आणि त्यांच्यातही डिजिटल मीडिया वेगाने वाढत आहे. उपजीविकेसाठी कालिदास, टॉलस्टॉय ही नावे माहिती असणे जरुरीचे नाही मग कशाला त्या फंदात पडा हा दृष्टिकोन दोन्ही गटात म्हणजे मूठभर बरे वाचन असणारे सोडता संपूर्ण समाजात आढळतो.

ज्ञानसाधनेत शॉर्टकट्स नसतात. दीर्घ आणि सखोल वाचनाची सवय लावून घ्यायला लागते. असे वाचन मेंदूचे सर्किट बदलते, तुम्ही स्वतःच्या संकुचित जगातून बाहेर पडता, सहसंवेदना वाढते. आजच्या अतितांत्रिक काळात तर अतांत्रिक, काल्पनिक वाङ्मय वाचणे आवश्यक आहे. त्याने शब्दसंग्रह वाढतो, मेंदूचा डावा भाग अधिक सक्रिय होतो. त्यायोगे आपली एकाग्रता वाढते, तर्क करण्याची क्षमता वाढते आणि खोल विचार करता येतो. या घटकांच्या पुष्टीने समाजाला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे महत्त्व कळते आणि मुक्त लोकशाही अस्तित्वात येऊ शकते.

यांच्या तुलनेत डिजिटल मीडिया मन भरकटवतो कारण एकाच वेळी अनेक प्रक्षेपणे - जाहिराती, नोटिफिकेशन्स, निरोप, अलर्टस वगैरे आपले लक्ष वेधण्याच्या स्पर्धेत असतात. सोशल मीडियाची रचनाच अशी असते की प्रचंड प्रमाणात अगदी छोट्या तुकड्यात माहितीचा आपल्यावर वर्षाव होतो आणि या वर्षावाची चटक लागते. या माहितीत सूक्ष्म, तरल छटा नसतात. त्याचा परिणाम म्हणजे आपण एका माहितीच्या तुकड्यावरुन पुढच्या असंबद्ध माहितीच्या तुकड्याकडे उडी घेतो, यात यूट्यूबसारख्या सोशल मीडियात खोट्या बातम्या, अफवाही पसरवल्या जातात. गायींची कथित कत्तलीसाठी वाहतूक केली जात आहे अशा अफवांचा हिंसक परिणाम आपल्याकडे दिसलेला आहे. त्यात आर्टिफिशल इंटेलिजन्स नवीन मिती देईल.

संशोधन असेही सिद्ध करते की दिवसा दोन तासांपेक्षा जास्त वेळ फोन 'स्क्रीन' वर घालवणाऱ्या मुलांची स्मरणशक्ती कमकुवत असते. अमेरिकेत काही शाळा स्मार्टफोन तेथे वापरायला परवानगी देत नाहीत. त्यांच्या इतर सोयींनुसार, त्यांची फी साध्या शाळांच्या कित्येक पट असते. ती सामान्य कुटुंबाच्या आवाक्याबाहेर असते. परिणामतः खरी साक्षरता ही अगदी उच्च वर्गापुरती मर्यादित रहाणार.

मेरी हरिंग्टन नावाची विदुषी या डिजिटल प्रसाराची तुलना फास्ट-फूडशी करते. ते जसे व्यसन व्हायला वेळ लागत नाही आणि आरोग्यावर नक्की दीर्घकालीन दुष्परिणाम करते, तसेच डिजिटल मीडियाचे परिणाम.

राजकीय, आर्थिक सत्ताधारी वर्गाला बहुसंख्यांचे डिजिटल व्यसन फायद्याचे ठरु शकते. लोकांना धोरणाचे सखोल विश्लेषण नको असते. त्यांना हवे ते चटपट आकर्षक प्रक्षेपण सतत देऊन आपला स्वार्थ हा वर्ग साधतो. नव्या शतकात विकसित देशात जन्माला आलेल्या नव्या पिढीत लोकशाहीबद्दल आस्था दिसत नाही.

तंत्रज्ञानाच्या या प्रसाराबरोबर इतर घडामोडीही त्याला उजव्या कुशीवर छळतात.

इराण-इस्रायल युद्ध, त्यातील विनाश; इस्रायलने चालू ठेवलेली पॅलेस्टीनी हत्या व दैना. तिचे दर्शन दररोज अल-जझीरा आणि टर्किश टीव्हीवर सतत चालू असते. ती पहाता आपण एकविसाव्या शतकात आहोत का असा प्रश्न पडावा.

हे सगळे भीषण नाट्य सगळे जग बघत आहे. पण इस्रायलला शस्त्र पुरवठा करण्यात पाश्चात्य देशांना आर्थिक फायदा असल्याने हत्याकांड चालू रहाते. तुरळक मोर्चे निघतात, लोक टीव्हीवर संतापाने बोलतात एवढाच निषेध.

रशियाने चालू ठेवलेला युक्रेनमधील विध्वंस, तेथील मानवी आणि निसर्गाचा संहार, उद्ध्वस्त होत असणारी गावे, शहरे आणि प्रचंड विस्थापन. त्याबरोबरच ट्रम्पसारख्या अद्‌भुत नेतृत्वाचा अमेरिकेतील उदय आणि तो ढकलत असलेल्या जगाची घसरण.

ही परिस्थिती बदलण्याची सामान्यांची वैयक्तिक अक्षमता आणि उदासीनता याचा त्याला त्रास होत असे.



थोडक्यात डाव्या कुशीवरचे विचार वैयक्तिक भूतकाळाशी निगडित असत तर उजव्या कुशीवरचे झाड हा साक्षात वर्तमान असे आणि विचार समकालीन सामाजिक असत.

तरी या रोजच्या कूस नाट्याला कंटाळून त्याने सप्तपाताळातील एका अघोरी मांत्रिकाचा सल्ला घेतला. त्याची रोजची तळमळ ही तपश्चर्या मानून मांत्रिकाने त्याला एक सिद्धी दिली. त्यायोगे तो वेगळा अवतार घेऊ शकेल. हवे तेव्हा तो परत मानवी स्वरुपात येईल. या भेटीनंतर पुढच्या क्षणी तो त्याच्या पलंगावर आदळला. पृथ्वीवर खरी रात्र चालू होती. त्याने लगेचच सिद्धी अजमावयाचा प्रयोग करायचे ठरवले. कोणता अवतार घ्यायचा? शक्यता अनेक होत्या - सजीव प्राणी किंवा पक्षी होणे, निर्जीव वस्तू होणे, इ. त्याने सुरुवात म्हणून तीन अवतार निवडले. त्यामागे काहीच निश्चित योजना अशी नव्हती. झाड, पांघरुण आणि रस्ता. सध्याच्या पर्यावरणप्रेमी वातावरणानुसार त्याने प्रथम झाड व्हायचे ठरवले.

जवळच्या रस्त्यावरच्या फुटपाथवरची दोन झाडांमधली एक जागा ठीक होती. रस्ता वर्दळीचा होता. सतत वाहनांची ये-जा दोन्ही दिशांनी चालू असे. अल्पावधीतच त्याला या आवाजाचा त्रास होऊ लागला पण झाड व्हायचे म्हटल्यावर शहरातल्या गर्दीच्या रस्त्यावरील आवाज टाळता येणार नाहीत हे त्याच्या लक्षात आले आणि शहाण्या झाडासारखा तो तेथे उभा राहिला.

थोड्याच वेळात एक कुत्रे घाईघाईने आले आणि त्याच्या बुंध्यावर मागचा पाय वर करुन त्याने शू केली. त्याला हे अपेक्षित नव्हते पण करतो काय!

मग येणाऱ्या जाणाऱ्या पादचाऱ्यांना तंबाखू किंवा तंबाखूचे पान आता उचकी देणार असे वाटून त्यांनी याच्यावर मनसोक्त लांबचलांब रंगीत पिचकाऱ्या टाकल्या.

जरा वेळाने जवळच्या कॉलेजातील मुले आली आणि त्यांनी दोन तीन पत्रके चिकटवली. एकाने तोंडातला च्युईंग गम चिकटवला.

त्यांच्या मागोमाग येऊ घातलेल्या निवडणुकीच्या उमेदवारांचे कार्यकर्ते आले आणि त्यांनी त्यांची प्रचारपत्रके लावली.

मग एक वडापाववाला त्याची हातगाडी घेऊन आला. त्याने त्याचा बोर्ड या आणि शेजारच्या झाडावर लावला. हे झाड नवीन आहे हे त्याच्या लक्षातही आले नाही! ही माणसांची पर्यावरणाबाबत जागरुकता!

त्याचे तळण सुरु होताच तीव्र उग्र वासाच्या वाफाही सुरु झाल्या. त्या झाडाच्या फांद्यांना तो वास देऊ लागल्या.

त्यातल्या त्यात बरी गोष्ट म्हणजे कावळे, चिमण्या, पोपट, एखादी घारही अधूनमधून येऊन बसत असत.

दरम्यान वर्दळ चालूच असल्याने वाहनांचे धूर, धूळ यांचा मारा सतत होत होता.

त्यात एक बाई आली आणि तिने घरातला ओला कचरा पायथ्याशी टाकला. त्याचा वास वडेपावाच्या वासापेक्षा निराळा आणि सडका होता पण गाडीवाल्याने तो कचरा गोळा केला आणि जरा दूर टाकला. म्हणजे त्याच्या गिऱ्हाईकांना त्रास नको.

मग एका माणसाने एक दगड आणला, तो पायथ्याशी ठेवला आणि त्याला शेंदूर फासला. येणारे जाणारे नमस्कार करु लागले.

झाड असल्याने हलताही येईना. या अवताराचा हिसका त्याला अल्पावधीतच बसला. आता खेड्यातल्या झाडाचा अवतार घ्यावा काय असा विचार तो करु लागला. नवीन 'देव' मागे ठेवून त्याने अवतार संपवला.

पुढच्या रात्री एक पांघरुण व्हावे असे त्याने ठरवले.

प्रथम तो एक हलके पांघरुण झाला म्हणजे झोपलेल्याला कळणार नाही. शहरात गेला. अनोळखी घरात जाऊन अनोळखी माणसावर पडावे असा त्याचा विचार होता. पहिला तो एका छोट्या घरात गेला तेथे चार-पाच जण एका खोलीत झोपले होते. त्यातल्या एकावर तो पसरला. त्या माणसाला घामाचा आणि इतरही अस्वच्छतेचा वास येत होता. इतका, की त्याला तेथे राहवेना, मग तो उठला आणि दुसऱ्याच्या अंगावर पडला. हा इसम निदान घामट तरी नव्हता पण झोपेत बडबडत होता, हातवारे करत होता. तिसऱ्याचा त्याने प्रयत्न केला. हा माणूस अतोनात घोरत होता.

ती इमारत सोडून जरा श्रीमंत इमारतीतील एका फ्लॅटमध्ये तो गेला. इथे एक पुरुष बाहेर सोफ्यावर झोपला होता. तर बहुधा त्याची बायको असावी - ती आतल्या खोलीत कॉटवर होती. एक छोटे बाळ बाजूच्या पाळण्यात होते.

एकूण प्रौढांना पांघरुण घालण्याचा कार्यक्रम फारसा काही सुखाचा नव्हता म्हणून त्याने आता बाळाच्या पाळण्यावर पडावे असे ठरवले आणि तसे केले. बाळ शांत होते. पण जरा वेळाने हालचाल सुरु झाली. त्याने त्याची आई उठली, तिने पांघरुण बाजूला केले पण हे घरचे पांघरुण नाही, वेगळेच पांघरुण आहे हे काही तिच्या लक्षात आले नाही. कारण ती बाळात व्यग्र होती. मग तो तेथून बाहेर पडला.

एका नव्या ठिकाणी गेला. तेथे एक माणूस बाहेरच्या खोलीतच जमिनीवर पालथा निजलेला होता. निदान हा तरी स्वस्थ असेल या अपेक्षेने पांघरुण त्याच्यावर पसरले. तो शांत पडला होता. काही मिनिटेच गेली असतील आणि तीन चार पोलीस आणि एक माणूस आत आले. 'हा बघा' असे तो माणूस पोलिसांना म्हणाला.

पोलिसांनी पांघरुण काढून त्याला उताणा केला, नाडी तपासली, डोळे उघडून बघितले आणि तो मेला असल्याचे जाहीर केले. पांघरुणाने तेथून पळ काढला, म्हणजे आपण एका मुडद्यावर पडलो होतो हे लक्षात येऊन पांघरुण काही काळ थरथरले. या धक्क्यातून बाहेर येण्यासाठी नवीन ठिकाणी जाणे एवढाच मार्ग

होता.

म्हणून तेथून तो एका रेल्वे स्टेशनवर गेला. एका प्लॅटफॉर्मवर अनेक माणसे झोपली होती त्यातील एकाला याने निवडला. जरा वेळाने तो माणूस जागा झाला आणि हे पांघरुण पाहून त्याला आश्चर्य वाटले. त्याने शेजारच्याला उठवले आणि म्हणाला 'हे बघ, माझे नाही, कोठून आले कळत नाही.' शेजारचा भाविक होता. ही देवाची भेट आहे असे त्याचे मत पडले. 'आपल्या सगळ्यांच्यात तूच सच्छील आहेस. देवाने त्याचे कौतुक या भेटीने दाखवले आहे.' त्याने बरोबरच्या इतर लोकांना हाका मारुन, गदागदा हलवून उठवले आणि पांघरुण दाखवले. मंडळी स्तिमित झाली. त्यांनी पांघरुण व्यवस्थित त्याच्या खांद्यांवर घातले.

कुंभमेळ्यासाठी (व नेहमीप्रमाणे) अनेक रेलगाड्या अनिश्चित काळापर्यंत उशीरा येणार असल्याने प्रवाशांची गर्दी तुडुंब होती. हा चमत्कार ऐकून बाकी प्लॅटफॉर्म्सवरची मंडळीही लगबगीने तेथे आली.

सगळेजण मिळून देवाचे भजन म्हणू लागले. घोळक्यातील स्त्रिया त्या माणसाच्या पाया पडू लागल्या, पूजा करु लागल्या व आरती म्हणू लागल्या. असा भक्तीचा मोठाच सोहळा तेथे सुरु झाला आता या माणसाची शहरातून मिरवणूक काढावी याबद्दल सर्वांचे एकमत झाले. त्यातील एक पोलीस अधिकारी होता. त्याने मिरवणुकीचा मार्ग आणि कॉर्पोरेशनची परवानगी मिळवून देण्याची जबाबदारी घेतली.

आता पांघरुण अस्वस्थ व्हायला लागले. हे नाटक कोठपर्यंत जाणार याची त्याला धाकधूक वाटू लागली. त्याने पांघरुणाचा अवतार संपवला आणि तो त्याच्या कॉटवर जागा झाला. तिकडे भक्तमंडळीत बराच गोंधळ झाला. पण 'देवाने दिले ते देवाने नेले' अशा निर्णयाप्रत मंडळी आली आणि त्यांचा देवावरचा विश्वास आणखीच दृढ झाला.

पुढच्या दिवशी त्याने रस्ता होण्याचे ठरवले. प्रथम शहरात, मग खेड्यात. शहरातल्या रस्त्याचा त्याला अपेक्षित अनुभव आला. पादचारी आणि सायकल हेच त्याला क्लेश न देणारे होते. मग चढत्या क्रमाने स्वयंचलित दुचाकी वाहने, मग तीनचाकी रिक्षा आणि टेम्पो मग चारचाक्या - मोटारी, बसेस, ट्रक, डंपर वगैरे वेगाने त्याला खरवडत, ओरबाडत, क्रूरपणे प्रसंगी बेफाम वेगाने जात असत. अगदी अनावश्यक कर्कश्श हॉर्न्स, कचाकच ब्रेक दाबणे हा वाहन चालवण्याचा अविभाज्य भाग होता. प्रत्येक वेळी माणसांना ठोकण्यापर्यंत नाही तरी एकमेकांवर आदळण्याचा कार्यक्रम अव्याहत चालू असे. वाहतूक पहाटे पाच-साडेपाचपासून मध्यरात्रीपर्यंत अखंड चाले. जरा खंड फक्त एखादा गंभीर अपघात देई. मग एक-दोन पोलीस येत, त्या लेनमधील थोडी वाहतूक थांबवत. पण सामान्यतः अपघाताचा निकाल लगेच लावण्यात येई. जरुरीप्रमाणे जास्तीचे पोलीस व्हॅनमधून येत, क्वचित ॲम्ब्युलन्स येई. जखमी इसमाला घेऊन जाई, गाड्या रस्त्याच्या कडेला ढकलल्या जात. दर दिवशी हाच परिपाठ. तो दोन-तीन दिवसांतच कंटाळला आणि गावाकडे जाण्याचा निर्णय घेतला

तेथे त्याने गावाबाहेर जाणारा रस्ता होण्याचे ठरवले. वाहने अगदीच तुरळक होती. आला तर एखादा टेम्पो, एखादा ट्रक, एखादी मोटरसायकल आणि दोन एस टी बसेस यायच्या. या अवतारात तो जरा सुखावला. दुसऱ्या दिवशी गावाबाहेरच जाणाऱ्या दुसऱ्या दिशेचा रस्ता झाला. इथे प्रॉब्लेम निराळा होता. गावाजवळचा रस्ता पक्का डांबरी होता कारण तो स्थानिक कॉर्पोरेशनच्या हद्दीत होता. पण जरा अंतरावर तो कच्चा झाला होता आणि पुढेपर्यंत कच्चाच होता. पुढचा रस्ता निरनिराळ्या लहान वस्त्यांना जात असे. तो पक्का करण्याची जबाबदारी त्या वस्त्यांची होती. ती त्यांनी शक्य तेवढी टाळली होती. लोकांची सोय हा घटक राज्यकर्त्यांच्या गणतीत भारतात क्वचितच असतो, असला तर युरोपात. दिसलाच नवा रस्ता तर पुढच्या निवडणुकीच्या आसपास दिसावा. आजतरी त्यात खड्डे बरेच आणि मोठे होते.

त्यात नेमका बदाबदा पाऊस आला. वस्तुतः पावसाळा नव्हता पण जागतिक एकमतानुसार हवामान बदलले होते. पाणी डांबरी भागावर वाहून गेले पण मातीच्या कच्च्या भागावर तुंबले. खड्डे भरुन गेले. एक मोटरसायकलवाला जोरात आला. त्याच्या सायकलवर कागदपत्रांची एक बॅग मागे लावलेली होती. तो सरळ खड्ड्यात गेला. वाहन तर बुडालेच, तोही अर्धा पाण्यात गेला. मानवी स्वभावानुसार तो आरडाओरडा करु लागला. तेथे काळे कुत्रेही नव्हते त्यामुळे ओरडणे व्यर्थ होते हे लक्षात यायला त्याला दोन-तीन मिनिटे लागली. मग त्याचा तो कष्टाने पाणी, चिखल यातून बाहेर आला. मदतीची काहीच शक्यता नव्हती. मोटरसायकल तर पाण्यात पार बुडून गेली होती. म्हणजे ते महत्त्वाचे पेपर्सही गेले. फोनही ओला झाल्याने बंद पडला होता. तो माणूस चरफडत आणि तडफडत त्याच्या वस्तीच्या दिशेने चालू लागला. उद्या फोनाफोनी करुन मोटरसायकल बाहेर काढण्याचा प्रयत्न करु असे स्वतःला समजावू लागला. मागून येणाऱ्या शाळेच्या दोन तीन मुलांनी हा प्रकार लांबून पाहिला होता, ते जपून बाजूने चालत गेले.

म्हणजे, दोन दिवसांचा ग्रामीण रस्त्याचा प्रयोगही फारसा यशस्वी झाला नाही.

आपण सिद्धीचा पुरेसा वापर करत नाही अशी त्याला शंका येऊ लागली. अर्थात, तिन्ही अवतारात मानवी झोपेचा प्रॉब्लेम गायब झाला होता कारण झोपच थांबली! पण पर्याय काही जमत नव्हते.

आता एखादा कर्तरी अवतार हवा, आपणहून काहीतरी

करायला हवे. पांघरुण, झाड, रस्ता स्वतः होऊन विशेष काहीच करत नव्हते. झाड आणि रस्ता तर निष्क्रियच होते.

मग उजव्या कुशीवर झोपायचा प्रयत्न करता ज्या जागतिक घडामोडी त्याला जाग्या ठेवत असत, त्यांच्याकडे वळायचे त्याने ठरवले. त्यासाठी तो गिधाड झाला.

म्यानमार या शेजारच्या देशात बौद्ध सरकारी लष्कर, बौद्ध भिक्षु व बौद्ध जनता यांचे स्थानिक रोहिंग्या मुस्लिमांवर अत्याचार बरीच वर्षे चालू आहेत. सरकारविरोधी इतरही अनेक गट स्वायत्ततेसाठी हिंसक सक्रिय आहेत. आराकान, कारेन,राखीन, वगैरे. गिधाडाला तेथे खायला भरपूर होते पण गेली कित्येक वर्षे हिंसाचार भडकल्याने अनेक गिधाडे तेथे आधीच आली होती. प्रामुख्याने चीनहून. या गिधाडाला मांत्रिकाचा आशीर्वाद असल्याने त्याला अग्रक्रम होता आणि अभय होते. ते इतरांवर मात करुन मांसावर आधी तुटून पडू शकले. बाकीची गिधाडे त्याचे खाणे संपेपर्यंत वाट बघत असत.

तेथे थोड्या प्रमाणात मुस्लिम - कारण इस्लामनुसार मृताचे दफन लगेच केले जाते - पण जास्त करुन बौद्ध मांस चाखून तो बांगलादेशाला गेला. शेख हसीनाच्या उच्चाटनानंतर तेथे हिंदूविरोधी वातावरण निर्माण झाले होते. त्याला भारतविरोधी पैलू होता, विशेषतः भारतसरकारच्या 'घुसखोर' बांग्लादेशीयांविरुद्धची मोहीम. त्यामुळे बांगलादेशात मुस्लिम हिंदूंच्या विरोधात होते आणि त्यांच्या कत्तली करत होते. म्यानमारमध्ये भरपूर मांस होते, त्यामानाने इथे कमी होते पण चव वेगळी होती. गिधाडाचे काही काळाचे खाणे निघाले.

तेथून ते युक्रेनला रवाना झाले.

युक्रेन आधीच्या सोविएत युनिअनचा भाग होता अंतर्गत विरोध आणि ऐतिहासिक कारणे यामुळे सोविएत युनिअनचे १९९१ साली विघटन झाले. १९९९ पासून पंतप्रधान आणि नंतर राष्ट्राध्यक्ष म्हणून पुतीन सत्तेवर आला. त्याला सोविएत युनियनचे विसर्जन अमान्य होते. त्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प युनियनचे पुनरुज्जीवन करणे हा राहिला. सुरुवात युक्रेनपासून झाली. आधी त्याने युक्रेनचा एक भाग - क्रायमिया नावाचा प्रांत बळकावला. ते सत्तांतर अहिंसक झाले. त्यातून बळ घेऊन त्याने युक्रेनवर चढाई केली. पण युक्रेन त्याला विरोध करेल अशी त्याला अपेक्षा नव्हती. युक्रेन रशियापेक्षा लष्करीदृष्ट्या अगदीच कमकुवत होता पण त्याने या चढाईचा कडवा विरोध केला आणि दोन्ही देशात भयानक युद्ध सुरु झाले.

गिधाड तेथे पोचले तोपर्यंत जीवितहानी बरीच झाली होती.

युद्ध चालू होते. सैनिकांची, नागरिकांची प्रेते अजूनही रस्त्यांवर होती. या नव्या गोऱ्या मांसावर गिधाड मनसोक्त तुटून पडले.

युक्रेनहून गिधाड मध्यपूर्वेत गेले.

त्याला दोस्तांनी पूर्वसूचना दिली होती की तेथे बहुतांशी, किंबहुना सगळेच अरब मृत्यू पावलेले आहेत त्यामुळे तेथे ताजे मांस मिळणार नाही. तरीही तेथील परिस्थिती प्रत्यक्ष पाहायला गिधाड उत्सुक होते म्हणून तेथे गेले.

इथला इस्रायल-पॅलेस्टाईन संघर्ष चांगलाच भडकला होता. इस्रायलविरुद्धच्या हमास नावाच्या पॅलेस्टिनी संघटनेने इस्राएलच्या काही वस्त्यांवर व तरुणांच्या एका सार्वजनिक संगीताच्या कार्यक्रमावर हल्ला करुन सुमारे १२०० ज्यू ठार मारले आणि २५० लोक पळवले. त्यांना ओलीस ठेवून आपल्या मागण्या पुढे केल्या. प्रत्युत्तर म्हणून इस्रायलने पॅलेस्टाईनच्या गाझा नावाच्या प्रांतावर हल्ला केला. सांगायला हल्ला इस्लामी आतंकवाद्यांविरुद्ध होता पण निर्दोषांच्या राहत्या वस्त्यांवर बॉम्बहल्ले करण्यात आले. कित्येक मजली फ्लॅट्सच्या उंच इमारती जमीनदोस्त करण्यात आल्या. त्या अचानक कोसळलेल्या इमारतींच्या खाली कितीशे लोक गाडले गेले याची गणती नाही कारण तो प्रदेश स्वच्छ झालाच नाही. अख्खी गावे बेचिराख झाली. ८०% प्रदेश परत रहाता न येण्यासारखा झाला. इथे इस्रायलने कसेही करुन पॅलेस्टिनींना ठार मारायचे ठरवले होते. म्हणून कत्तलीबरोबर अरबांची उपासमार सुरु केली. शेकड्यात भूकबळी पडू लागले, प्रामुख्याने मुले. आधीच गाझामध्ये आरोग्यसेवा काही स्तुत्य नव्हती. त्यात युद्धात कित्येक हजारात अपंग झाले. अनेकांचे हातपाय कापावे लागले. त्यातही मुले अनेक. विशेष सेवा उपलब्ध नाही. त्यामुळे काही हजार आयुष्यभर अपंग राहणार किंवा अकाली दगावणार.

नोंदण्यासारखी गोष्ट म्हणजे, १२०० इस्रायली ठार मारले गेले तर पश्चिमेत अवडंबर माजले. इस्रायलला शस्त्रपुरवठा सुरु झाला. त्यात लढाऊ विमाने आली, बॉम्ब आले, बंदुका आल्या पण वीस महिन्यांतील ६० हजाराहून जास्त पॅलेस्टिनी मृत्यूंनी एकही पाश्चात्त्य राष्ट्र हलले नाही.

इस्रायलचे लष्करी सामर्थ्य हमासच्या कित्येक पट होते कारण त्याला प्रामुख्याने म्हणजे ७०% अमेरिकेचा सशस्त्र पाठिंबा होता. तसेच जर्मनी, इटली - शस्त्रपुरवठा करत असत. हमासला काही अरब राष्ट्रातील मुस्लिम संघटनांचा व इराणचाही अप्रत्यक्ष पाठिंबा होता. मृत देहाची त्वरित विल्हेवाट असल्याने गिधाडाला फार काही खायला मिळाले नाही.

त्याला मित्रांनी सल्ला दिला की सतत खाणे त्याला अमेरिकेत मिळू शकेल. अन्यथा आज रवांडा-काँगो युद्ध, उद्या सुदान, परवा इथिओपियातील चकमक असे त्याला फिरत रहावे लागेल. अमेरिकेत जवळजवळ रोज हत्याकांडे चालू असतात. कधी सुपरमार्केटमध्ये माथेफिरु हल्ला करतो, कधी शाळांमध्ये, कधी गगनचुंबी इमारतीतील ऑफिसेसमध्ये. खासगी खून तर निराळेच. तसेच अलीकडे अमेरिकेत वणवे, जलप्रलय होत असतात, त्यातही

बळी पडतात. तेथे बळीही जगभरच्या देशांचे असतात - गोरे, काळे, मिश्रवर्णीय. त्याला तेथे विविध प्रकारचे मांस मिळेल - शुद्ध शाकाहारींचे, मांसाहार म्हणून फक्त मासे खाणाऱ्यांचे, निखळ मांसाहारींचे, अट्टल दारुड्यांचे, दारुला स्पर्शही न करणाऱ्यांचे आणि व्यक्तिगणिक रोगट.

हे ऐकून गिधाडाच्या तोंडाला पाणी सुटले आणि ते त्वरित अमेरिकेला रवाना झाले. त्याच्या देशाचे पंतप्रधान जसे जनतेच्या पैशाने जगभर अविरत हिंडत असत, तसेच गिधाडाचे भ्रमण होते. अमेरिकेला गेल्यावर मात्र भारतीय इंजिनियर्ससारखे तेथेच काही काळ रहावे असे त्याने ठरवले.

त्याच्या मृत मांस खाण्याच्या सवयीचे पर्यावरणाला मोठेच योगदान होते ते लक्षात घेऊन त्याला जागतिक पुरस्कारही मिळाले. आता आपले कार्य योग्य मार्गाने जात आहे असा त्याला विश्वास आला. गिधाड असले तरी या जनमान्यतेने ते सुखावले.

म्हणजे निद्रानाशापासून पर्यावरणाच्या मदतीपर्यंत ही वाटचाल झाली. माणूस आणि त्याचा निद्रानाश या धामधुमीत केव्हा विसर्जन पावले कोणास ठाऊक! अर्थात चेटुकामुळेच हे श्रेयस्कर परिवर्तन शक्य झाले.

*चन्द्रशेखर पुरन्दरे, लंडन*
*purandarearts.com*
*artnondeco@yahoo.co.uk*

❐